**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमारमण व्यंकटेश कोंतम
ब्लॉक नं.बी-१/११/१,५४-ब,
भवानी पेठ, होमकर नगर सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
होटगी रोड, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
होटगी रोड, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७९२/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०८.०४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री.रमारमण व्यंकटेश कोंतम<br>ब्लॉक नं.बी-१/११/१,५४-ब,<br>भवानी पेठ, होमकर नगर सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>होटगी रोड, सोलापूर श्री.एम.के.भरसट<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** उपकार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>होटगी रोड, सोलापूर श्री.न.आ.चौधरी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

शासकीय दूध योजना, सोलापूर येथील काही इमारती पाडण्याबाबत आपण जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, होटगी रोड, सोलापूर यांच्याकडे दि.१८.०७.२००९ च्या पत्रान्वये मागितलेली माहिती दि.०९.११.२००९ रोजी व अपुरी मिळाली. सन १९८५ पासून या इमारतींवर झालेल्या देखभाल खर्चाची माहिती दिली नाही. इमारती पाडण्याविषयीच्या निर्णयासाठी वापरल्या जाणाऱ्या शास्त्रीय पध्दतीची माहिती दिली जात नाही, कारण अशास्त्रीय व नियमबाह्य पध्दतीने निर्णय घेण्यात आले आहेत, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.रमारमण व्यंकटेश कोंतम यांनी केले. माहिती विलंबाने व अपुरी दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, होटगी रोड, सोलापूर यांना शास्ती करावी, अशी मागणी त्यांनी केली.

संबंधित माहिती अन्य विभागाकडे असल्यामुळे श्री.कोंतम यांचा अर्ज वर्ग करुन माहिती दिली. दिलेली माहिती योग्य आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, होटगी रोड, सोलापूर श्री.न.आ.चौधरी यांनी केले.

श्री.कोंतम यांचा अर्ज दि.१८.०७.२००९ चा आहे. त्यातील एका मुद्दयांचे उत्तर जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, होटगी रोड, सोलापूर श्री.न.आ.चौधरी यांनी दि.३०.१०.२००९ रोजी दिले असून मुद्दा क्र.२ च्या माहितीसाठी तो दि.०३.११.२००९ रोजी म्हणजे श्री.कोंतम यांनी दि.१२.१०.२००९ रोजी प्रथम अपील केल्यानंतर अन्य विभागाकडे वर्ग केला आहे. या विभागाकडून प्राप्त झालेली माहिती दि.०९.११.२००९ च्या पत्रान्वये श्री.कोंतम यांना दिली आहे. दि.१७.०८.२००९ पर्यंत माहिती देणे आवश्यक असताना उपलब्ध माहिती दि.३०.१०.२००९ रोजी म्हणजे ७५ दिवस विलंबाने दिली आहे, ऊर्वरीत माहिती दि.०९.११.२००९ रोजी म्हणजे मूळ अर्जापासून ८४ दिवस विलंबाने दिली आहे. माहिती अन्य विभागाशी संबंधित असल्यास ५ दिवसांत त्या विभागाकडे अर्ज वर्ग करणे आवश्यक असताना तो जवळजवळ ७५ दिवसांनी वर्ग केला आहे. या बाबी लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, होटगी रोड, सोलापूर श्री.न.आ.चौधरी यांनी

कोणतेही सबळ कारण नसताना माहिती-मागणीच्या अर्जावरील कार्यवाहीस विलंब केला आहे. त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

इमारती पाडण्याच्या निष्कर्षासाठी वापरली जाणारी पध्दती व उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, होटगी रोड, सोलापूर श्री.न.आ.चौधरी यांनी दि.१७.०४.२०१० पर्यंत अपीलकर्त्यांस निःशुल्क पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. दि.१६.०४.२०१० च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, होटगी रोड, सोलापूर श्री.न.आ.चौधरी यांनी माहिती पुरविली. परंतु त्याने आपले समाधान झाले नाही. इमारती जुन्या व कमकुवत झाल्याचा निष्कर्ष केवळ नजरेने पाहणी करुन काढणे व इमारती पाडणे बेकायदेशीर आहे. पाण्याची टाकी भक्कम असतानाही गळतीचे कारण दाखविले आहे, अशा स्वरुपाची तक्रार श्री.कोत्तम यांनी दि.२९.०४.२०१० रोजीच्या पत्रान्वये आयोगाकडे केली आहे. तथापि त्यांचे हे आक्षेप माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत निर्णयाचे नाहीत.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, होटगी रोड, सोलापूर श्री.न.आ.चौधरी यांनी माहिती देण्यास ८४ दिवसांचा विलंब लावल्याने (८४ दिवस x रु.२५०/-) रु.२१,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती त्यांच्या जुलै,ऑगस्ट व सप्टेंबर २०१० या महिन्यांच्या ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर २०१० मध्ये देय असणाऱ्या वेतनातून वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६० इतर सेवा,८००, इतर जमा रकमा,(१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशीर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, होटगी रोड, सोलापूर यांनी करुन याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

स्थळ : पुणे
दि. 29 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.नामदेव बाबासाहेब खरात
मु.पो.निरा, ता.पुरंदर, **अपीलकर्ता**
जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय पुरंदर,
ता.पुरंदर, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय सासवड,
ता.पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री. नामदेव बाबासाहेब खरात यांनी दि.१४/०१/२००८ रोजी केलेल्या बिनशेती दाखला मागणीच्या अर्जाची छायाप्रत व त्या अनुषंगाने करण्यात आलेल्या स्थळनिरीक्षण व अन्य कार्यवाहीबाबतचा तपशील | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. नामदेव बाबासाहेब खरात यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी निवासी नायब तहसीलदार,

तहसील कार्यालय सासवड, यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय पुरंदर, यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 18 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विजय साहेबराव ओहोळ
देशमुख पाटील वस्ती, हौसे वस्ती,
देगाव नाका रोड, सोलापूर                                        अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (जनरल),
पुणे महानगरपालिका, पुणे                                        उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सेवकवर्ग विभाग अधिकारी,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४२ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ८.४.२०१० |

३. **उपस्थित-**

**अपीलकर्ता -** श्री. विजय साहेबराव ओहोळ
देशमुख पाटील वस्ती, हौसे वस्ती,
देगाव नाका रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (जनरल),
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. के. सी. कारकर

**जन माहिती अधिकारी** तथा सेवकवर्ग विभाग अधिकारी,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. शिवाजी दौंडकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.१०.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.११.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सेवकवर्ग अधिकारी यांच्या कार्यालयात आवक झालेल्या पत्रांच्या प्रती मिळण्याची मागणी आपण केली होती, ती निरंक असल्याचे उत्तर जन माहिती अधिकारी तथा सेवकवर्ग विभाग अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दिली. उपलब्ध माहिती दिली असल्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (जनरल), पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दिला. काही पत्रांच्या नोंदी जाणीवपूर्वक योग्य प्रकारे केल्या जात नसल्याचे उघड होणे व संबंधितांवर कारवाई होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. विजय साहेबराव ओहोळ यांनी केले.

श्री. ओहोळ यांनी नमूद केलेल्या कालावधीत आवक झालेल्या २३ पत्रांपैकी १४ पत्रांबाबत अ.क्र मांक व विषय नोंदविले नव्हते. अ.क्रमांक व विषय नोंदविलेल्या नऊ पत्रांच्या प्रती दिल्या व ऊर्वरित क्रमांकासमोर विषय नसल्यामुळे निरंक असे उत्तर दिले. उपलब्ध अभिलेखानुसार कार्यवाही केली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तथा सेवकवर्ग विभाग अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. शिवाजी दौंडकर यांनी केले.

सेवकवर्ग विभाग अधिकारी कार्यालयातील आवक बारनिशीमध्ये कोणतेही पत्र आवक झाले नसताना नुसते आवक क्रमांक नोंदवून ठेवणे व पुढे अर्जदारांच्या नावाची जागा रिक्त ठेवणे ही बाब कार्यालयीन कामकाजाच्या पध्दतीशी विसंगत व कार्यालयीन शिस्त व महानगरपालिका सेवा नियमांचा भंग करणारी आहे. त्यामुळे संबंधित बारनिशी सेविकेचा खुलासा मागविण्यात आला. संबंधित रिक्त आवक क्रमांक हे तत्कालीन सेवकवर्ग विभाग अधिकारी श्री. आशिष महाडदळकर यांनी रिक्त ठेवण्याबाबत तोंडी आदेश दिले होते, असा खुलासा संबंधित सेविकेने दिला. त्याबाबत श्री. महाडदळकर यांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला. त्यांचा खुलासा समाधानकारक नसल्यामुळे त्यांनी कामात केलेला निष्काळजीपणा विचारात घेऊन त्यांची एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम होईल अशा रितीने कायम स्वरूपी रोखून ठेवण्याची कारवाई

महानगरपालिका आयुक्तांनी केली आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (जनरल), पुणे महानगरपालिका, पुणे श्री. के.सी.कारकर यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

कार्यालयीन अभिलेखामध्ये नियमबाह्यरित्या हस्तक्षेप करण्याबद्दल व पर्यायाने चुकीची माहिती कायम स्वरूपी निर्माण करण्याबद्दल संबंधित कर्मचारी / अधिकाऱ्यांना शासन होणे आवश्यक आहे. त्यानुसार आयुक्त, महानगरपालिका, पुणे यांनी श्री. महाडदळकर यांच्यावर केलेली कारवाई उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 10 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

प्रा.संपत माधव त्रिभुवन
'भिमार्थ' इंगळेनगर,
सिध्दार्थ कॉलनी, वारजे नाका,
पुणे-५२

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,**
शिशु विकास मंदिर दौंड,
ता.दौंड, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
शिशु विकास मंदिर दौंड,
ताःदौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४२/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता प्रा. संपत माधव त्रिभुवन यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 22 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिलकुमार बावधनकर
c/o चोपडे एजन्सीज अॅण्ड कन्सल्टन्सीज,
हिरामण लांडे बिल्डिंग, कासारवाडी,
मुंबई पुणे रोड, पुणे-३४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय,**
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
पुणे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७५/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** अपीलकर्ता श्री.सुनिलकुमार बावधनकर व श्री.प्रभु विश्वनाथ चोपडे यांनी दि.४/१२/२००७ रोजी केलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीबाबतचा विस्तृत तपशील | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.सुनिलकुमार बावधनकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिलासोबत जोडलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पुणे विभाग, पुणे दि.२५/०१/२००८ च्या पत्रान्वये दिलेले उत्तर योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ★ पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :- 18 JUN 2010**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.विश्वनाथ मारुती गोरे
धनगर समाज धर्मशाळा,
३१२, चाकणरोड, घुंडरेआळी,
मु.पो.आळंदी,ता.खेड,
जि.पुणे,

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
आळंदी नगरपरिषद,
ता.खेड, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा पाणी पुरवठा विभाग,**
आळंदी नगरपरिषद,
ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८९६/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७/०४/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.विश्वनाथ मारुती गोरे<br>धनगर समाज धर्मशाळा, ३१२, चाकणरोड, घुंडरे आळी,<br>मु.पो.आळंदी,ता.खेड, जि.पुणे | |

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी तथा पाणी पुरवठा विभाग,**<br>आळंदी नगरपरिषद, ता.खेड, जि.पुणे<br>श्री.दत्ता बबनराव सोनटक्के<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**<br>आळंदी नगरपरिषद, ता.खेड, जि.पुणे<br>यांचे प्रतिनिधी श्री.एस.के.गिरमे |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** वैयक्तिक नळ कनेक्शन व विना परवाना बांधकामा-संदर्भातील माहिती |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. विश्वनाथ मारुती गोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.७/०४/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती. 'मला माहिती अधिकारी, पाणीपुरवठा विभाग, आळंदी नगरपरिषद, यांच्याकडून ९/०४/२०१० रोजी माहितीच्या नकला मिळाल्या. तक्रार नाही. अपील निकाली काढण्यास हरकत नाही', असे निवदेन अपीलकर्ता श्री.गोरे यांनी दि.९/०४/२०१० रोजी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 25 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विनोद सुभाष जवळकर — अपीलकर्ता
ओ/२२, मुक्तानंद सोसायटी, सर्व्हे नं.११, चव्हाणनगर,
धनकवडी, पुणे-१

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक,
सह धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड,
पुणे-१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा**
सह धर्मादाय आयुक्त, ढोले पाटील रोड, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | १८९९ / पुणे |
| २ | **सुनावणीची तारीख** | ११.३.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सह धर्मादाय आयुक्त, ढोले पाटील रोड, पुणे-१ | |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. २६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. ११.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री. विनोद सुभाष जवळकर यांनी दोन सार्वजनिक विश्वस्त संस्थांविषयीची सन १९६६ पासूनची माहिती मागितली होती. विस्तृत स्वरूपाची ही माहिती विहित मुदतीत देणे शक्य नव्हते. अपीलकर्त्याने कार्यालयात समक्ष संपर्क साधणार असल्याचे अर्जात नमूद केले होते, परंतु नक्कल शुल्क भरण्यासाठी त्यांनी संपर्क साधला नाही. तसेच न्यायिक निर्णयावरील स्पष्टीकरण, भाष्य /अभिप्राय वजा खुलासे त्यांनी मागितले होते. ते माहितीच्या अधिकारात येत नाही. कागदपत्रांची छाननी करून त्यांच्या अर्जाला दि. १.१.२००९ रोजी रजिस्टर्ड टपालाने उत्तर पाठविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सह धर्मादाय आयुक्त, कार्यालय, पुणे श्री. चद्रकांत आ. पाटील यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

अपीलकर्त्याने अतिव्याप्त स्वरूपाची व ४० वर्षांहून अधिक काळातील माहिती सरसकट पध्दतीने मागितली आहे. या स्थितीत जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सह धर्मादाय आयुक्त, कार्यालय, पुणे श्री. चद्रकांत आ. पाटील यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखाचे अवलोकन करून योग्य ते शुल्क भरून माहिती प्राप्त करून घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विठ्ठल काशिनाथ रोहकले
द्वारा श्री. सोमनाथ खोले,
'जय पार्वती कुंज', शेटे बंगला,
नाना भालेराव कॉलनी, मु.पो.तळेगाव-दाभाडे(स्टेशन),
ता.मावळ, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद पुणे,
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद पुणे,
पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९०२/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांच्या कार्यालयाकडून नारायणगांव पोलीस स्टेशन मध्ये दि.१९/१०/२००६ रोजी एफ.आय.आर.नं१३९/६ दाखल करण्यापूर्वी कार्यालयाने केलेला पत्रव्यवहार व नोंदी | |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२५/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. विठ्ठल काशिनाथ रोहकले हे अनुपस्थित होते. 'अपीलकर्ता श्री. रोहकले यांना सदर प्रकरणाबाबतची संपूर्ण

धरिका पाहण्यास दिनांक व वेळ कळवून आल्यास संपूर्ण धारिका दाखविली जाईल व आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती देण्यात येतील', असे जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद पुणे श्री.सिध्दार्थ चव्हाण यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. त्यानुसार अपीलकर्त्यांने आवश्यक तर जन माहिती अधिकाऱ्यांशी संपर्क साधून संबंधित धारिकेचे अवलोकन करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 22 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.पांडुरंग दत्तात्रय थिटे
३३०४, मु.पो.केंदूर, ता.शिरूर, जि.पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९०७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.पांडुरंग दत्तात्रय थिटे
३३०४, मु.पो.केंदूर, ता.शिरूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे श्री.डी.पी.शेंडकर

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे श्री.पी.डी.भंडारे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.२.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३.३.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

प्राथमिक शिक्षक / शिक्षण सेवक भरतीमध्ये भ्रष्टाचार झाला असून आपल्यावर अन्याय झाला आहे. आपल्या तुलनेत शैक्षणिक पात्रता, गुणवत्ता कमी असलेल्या उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली असून त्याबाबत चौकशी करून माहिती द्यावी व नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.पांडुरंग दत्तात्रय थिटे यांनी केली.

सन १९९७-९८ ते २००६-०७ या काळातील नियुक्त्या, भरती याच्याशी संबंधित अशी श्री.थिटे यांची तक्रार असून त्या संदर्भात ते सातत्याने पत्रव्यवहार व माहितीच्या अधिकारातील अर्ज करीत आले आहेत. वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली असून माहितीबाबत आपली काहीही तक्रार नसल्याचे त्यांनी लेखी दिलेले आहे. चौकशी करून माहिती देण्याची त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे श्री.पी.डी.भंडारे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे श्री.डी.पी.शेंडकर यांनी केले.

भरतीमधील भ्रष्टाचार व आपल्यावर अन्याय झाल्याची अपीलकर्त्याची तक्रार आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही. अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून सर्व संचिका दाखविण्याची व त्यातील आवश्यक कागदपत्रांच्या प्रती देण्याची तयारीही अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे यांनी दर्शविलेली आहे. हे लक्षात घेता, आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
29 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. रणजीत सुभाष भंडारे
टेभुंर्णी रोड, कुर्डुवाडी, ता.माढा, जि. सोलापूर .. अपीलकर्ता

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** समादेशक,
राज्य राखीव पोलिस बल गट क्र.५,दौंड, जि. पुणे .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** समादेशक सहाय्यक,
राज्य राखीव पोलिस बल गट क्र.५,दौंड,
जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | १९३४ / २०१० / सोलापूर |
| २ | **सुनावणीची तारीख** | ८.४.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. रणजीत सुभाष भंडारे<br>टेभुंर्णी रोड, कुर्डुवाडी, ता.माढा, जि. सोलापूर | |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य राखीव पोलिस दलातील सन २००९ मधील वर्ग ४ ची भरती प्रक्रिया अयोग्य पध्दतीने व चुकीची झाली. भरती प्रक्रियेतील उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रती देता येतात, असे सोलापूरचे जिल्हा पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी कार्यालयाचे लेखी पत्र आहे. मात्र उत्तर पत्रिकांच्या प्रती देता येत

नसल्याचे राज्य राखीव पोलिस बल गट क्र.५ दौंडचे जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे. दि. ६.२.२००९, ११.७.२००९, २२.७.२००९ व ११.९.२००९ अशा चार अर्जांद्वारे आपण मागितलेली माहिती अपुरी मिळाली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रणजीत सुभाष भंडारे यांनी केली.

विशिष्ट उमेदवारांचीच नियुक्ती कशी केली, भरती प्रक्रियेत भ्रष्टाचार झाला काय, अशा स्वरूपाची विचारणा श्री. भंडारे यांनी बहुसंख्य अर्जांमध्ये केली आहे. अशी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि भरती प्रक्रियेतील पारदर्शकतेच्या दृष्टीने अपीलकर्त्यांना हव्या असलेल्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रती दिल्या जाणे आवश्यक आहे. मात्र आपल्याला जाणीवपूर्वक कमी गुण दिल्याची व निवड न करून अन्याय केल्याची अपीलकर्त्याची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दखलयोग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. राज्य राखीव पोलिस दलात सन २००५ मध्ये झालेल्या वर्ग ४ च्या भरती प्रक्रियेतील अपीलकर्त्यास आवश्यक असलेल्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रती निःशुल्क पुरवून जन माहिती अधिकारी तथा समादेशक सहाय्यक, राज्य राखीव पोलिस बल गट क्र.५, दौंड यांनी आयोगाला अनुपालन अहवाल सादर करावा.

पुणे
दि. 29 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. आनंदा कृष्णा यादव
पो. सीहोरा, ता.राहतगड, जि. सागर (मध्यप्रदेश) — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
अधीक्षक, भूमि अभिलेख, कार्यालय सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
अधीक्षक, भूमि अभिलेख, कार्यालय सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४० / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ६.४.२०१० |

**३ उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
अधीक्षक, भूमि अभिलेख, कार्यालय सांगली
श्री. उदय व्यंकटेश कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.९.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.११.२००९ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

भूमिअभिलेखाच्या फेरतपासणी अर्जावर सन १९९५.९६ मध्ये अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली यांनी दिलेला निर्णय बरोबर की चुकीचा, त्यांनी अधिकाराचा गैरवापर केला का, अशा स्वरूपाची विचारणा अपीलकर्ता श्री. आनंदा कृष्णा यादव यांनी 'माहिती' म्हणून केली होती. जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, अधीक्षक, भूमि अभिलेख, कार्यालय, सांगली यांनी त्या संदर्भात योग्य ते उत्तर विहित मुदतीत दिले. अशा स्वरूपाचा अन्वयार्थ, अभिप्राय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत देता येणार नाही. संबंधित फेरतपासणी प्रकरणातील निर्णय अपीलकर्त्यांना अमान्य असल्यास नियमानुसार सक्षम अधिकाऱ्यांकडे त्यांनी अपील दाखल करणे योग्य आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, अधीक्षक, भूमि अभिलेख, कार्यालय सांगली श्री. उदय व्यंकटेश कुलकर्णी यांनी केले व तशा स्वरूपाचे अपिलीय प्राधिकाऱ्यांचे निवेदन त्यांनी सादर केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 15 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ... खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. यशवंत तुकाराम तलवारे
वाडेश्वरनगर,सर्व्हे नं.४९, चांधेरे यांचा तबेला,
वडगाव शेरी, पुणे-१४ .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २०.५.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. यशवंत तुकाराम तलवारे
वाडेश्वरनगर,सर्व्हे नं.४९, चांधेरे यांचा तबेला,
वडगाव शेरी, पुणे-१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे तर्फे प्रतिनिधी श्री. के.एन. चौधरी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे श्री. के.एन. चौधरी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.८.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.१०.२००९ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

आपल्याला हव्या असलेल्या महात्मा फुले विद्यानिकेतन संस्थेच्या पाच विद्यालयांच्या संदर्भातील रोस्टर आदींची माहिती अपुरी मिळाली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. यशवंत तुकाराम तलवारे यांनी केली.

संस्थेकडील माहितीसाठी श्री. तलवारे यांनी जिल्हा परिषद, शिक्षण विभागाकडे अर्ज केला, तो संस्थेकडे पाच दिवसांत वर्ग केला. संस्थेने माहिती दिली आहे व आणखी माहिती हवी असल्यास देण्याचे संस्थेने स्पष्ट केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्री. के. एन. चौधरी यांनी केले.

श्री. तलवारे यांनी पाच विद्यालयांकडील माहिती मागितली असून प्रत्येक विद्यालयाला स्वतंत्र जन माहिती अधिकारी आहेत. शिक्षण अधिकाऱ्यांनी अर्ज संस्थेकडे वर्ग केला. वास्तविक माहितीसाठी एकापेक्षा अधिक ठिकाणी अर्ज वर्ग करण्याचे बंधन नाही. तरीही संस्थेने तीन विद्यालयांची माहिती दिली आहे. अन्य विद्यालयांची माहिती आठ दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयागाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तीन विद्यालयांची माहिती घेऊन जाण्याबाबत संस्थेने श्री. तलवारे यांना कळविल्याचे सचीव, महात्मा फुले विद्यानिकेतन संस्था, हडपसर, पुणे यांनी दि. २६.५.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 16 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.नामदेव बाबासाहेब खरात
मु.पो.निरा, ता.पुरंदर,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीष्ठाता,**
ससून सर्वोपचार रुग्णालय,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी वैद्यकीय अधिकारी,**
ससून सर्वोपचार रुग्णालय,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६८/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००३ ते २००८ या कालावधीतील श्री. नामदेव बाबासाहेब खरात यांनी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्राच्या संदर्भातील कागदपत्रे | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२६/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्ता श्री. नामदेव बाबासाहेब खरात यांना वेळोवेळी माहिती व प्रमाणपत्रे दिलेली आहेत. तसेच त्यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीसाठी

तीन वेळेस तारीख देऊनही ते हजर राहिले नसल्याने प्रथम अपिलावर सुनावणी घेता आली नाही', असे जन माहिती अधिकारी वैद्यकीय अधिकारी, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.के.टी.सुकासे, प्रशासकीय अधिकारी व अपिलीय प्राधिकारी तथा अधीष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय, श्री.ए.वाय देहाडराय यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. तसेच 'मूळ रेकॉर्डशी पडताळणी करुन प्रमाणपत्री टक्केवारी देण्याची मागणी श्री.खरात यांनी केली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार ती योग्य ठरत नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 18 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप मच्छिंद्र घायतिडक
नाथ टेरेस, उज्वल सोसायटी,मुरारजी पेठ,
सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन अक्कलकोट रोड,
सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** विभाग प्रमुख वस्त्र निर्माण,
शासकीय तंत्रनिकेतन अक्कलकोट रोड,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८१/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०८.०४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप मच्छिंद्र घायतिडक
नाथ टेरेस, उज्वल सोसायटी,मुरारजी पेठ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन अक्कलकोट रोड,
सोलापूर श्री.एफ.ए.खान

**जन माहिती अधिकारी तथा** विभाग प्रमुख वस्त्र निर्माण,
शासकीय तंत्रनिकेतन अक्कलकोट रोड,
सोलापूर श्री.सु.ज.दंडोती

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दि.११.०८.२००९ रोजी आपण केलेल्या अर्जानुसार पुर्ण माहिती दि.०७.०४.२०१० पर्यंत दिली नाही. सेवापुस्तक कार्यालात उपलब्ध असतानाही उपलब्ध नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,अक्कलकोट रोड, सोलापूर श्री.एफ.ए.खान यांनी कळविले. गट विमा योजनेसारख्या रकमाही आपल्याला दिल्या नाहीत. त्याबद्दल संबंधितांवर शास्तीची व अन्य कारवाई व्हावी,अशी मागणी अपीलकर्ता श्री.दिलीप मच्छिंद्र घायतिडक यांनी केली.

श्री.घायतिडक यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे नेमणूक झाल्यामुळे सेवापुस्तक त्यांच्याकडे पाठविले होते. ते परत आल्यावर राहिलेल्या माहितीची पूर्तता केली. त्यांच्या रजा रोखीकरण व तत्सम अन्य मागण्या प्रशासकीय स्वरुपाच्या असून त्याचाही पाठपुरावा करण्यात येत आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख वस्त्र निर्माण, शासकीय तंत्रनिकेतन, अक्कलकोट रोड,सोलापूर श्री.सु.ज.दंडोती व अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन अक्कलकोट रोड, सोलापूर श्री.एफ.ए.खान यांनी केले.

श्री.घायतिडक यांच्या अर्जातील मुद्दा क्र. ३,४,५ व ६ यातील बहुंश भाग संभाव्य कार्यवाहीसंबंधी विचार करणारा आहे. तसेच त्यांची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. तथापि याबाबतही कार्यवाही करुन जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख वस्त्र निर्माण, शासकीय तंत्रनिकेतन, अक्कलकोट रोड,सोलापूर श्री.सु.ज.दंडोती व अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन अक्कलकोट रोड, सोलापूर श्री.एफ.ए.खान यांनी माहिती दिली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 29 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

सौ. मृणालिनी श्रीहरी जोशी
३१६, शनिवार पेठ, दत्तदिगंबर अपार्टमेंट,
सुयोग मंगल कार्यालयाच्या मागे, पुणे-३० .. अपीलकर्त्या

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे-१ .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १०.३.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्त्या -** सौ. मृणालिनी श्रीहरी जोशी
३१६, शनिवार पेठ, दत्तदिगंबर अपार्टमेंट,
सुयोग मंगल कार्यालयाच्या मागे, पुणे-३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे-१ डॉ. सौ. रेणू भारद्वाज

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी
ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे-१ प्रतिनिधी
श्री. के. टी. सुकासे, प्रशासकीय अधिकारी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.२.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.४.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १०.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपले सेवानिवृत्ती लाभ नियमबाह्यरित्या गोठवून ठेवण्यात आले आहेत, त्या संदर्भात व अन्य कार्यालयीन विषयाची माहिती विचारली असता योग्य प्रकारे दिली जात नाही. सन २००६ ते २००८ या वर्षात कार्यरत असलेल्या कार्यालयीन अधीक्षकांबाबत विचारले असता, संबंधित पदावर काम केलेले असतानाही दिलेल्या माहितीत आपल्या नावाचा समावेश केलेला नाही. माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे डॉ. सौ. रेणू भारद्वाज यांनी केले. तरीही योग्य माहिती मिहाली नाही, अशी तक्रार अपीलकर्त्या सौ. मृणालिनी श्रीहरी जोशी यांनी केली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे यांनी संबंधित मागणीत जनहित नसल्याच्या कारणावरून माहिती नाकारली. आहे त्या स्वरूपात माहिती द्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे डौ. सौ. रेणू भारद्वाज यांनी दिले. याच स्वरूपाची माहिती विविध वेळी अपीलकर्त्या सौ. मृणालिनी श्रीहरी जोशी यांना देण्यात आलेली असून टपालाने माहिती पाठविण्यात आली. अनेक मुद्दयांमध्ये त्यांनी खुलासे विचारले आहेत. अशी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'माहिती' ठरत नाही. चार मुद्दयांची माहिती न मिळाल्याचे त्यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले होते, ती माहिती यु.पी.सी. ने पाठविण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे श्री. के. टी. सुकासे यांनी संबंधित पत्रांच्या छायांकित प्रतींसह नमूद केले.

सौ. जोशी यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीसह खुलासे, गृहिते यांची सरमिसळ करणारी आहे. तथापि त्यांनी मागणी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत, त्या कार्यालय अधीक्षक होत्या की नाही याबाबतची संबंधित कालावधीसह स्पष्टता व त्यांच्या सेवानिवृत्ती लाभासंदर्भातील कार्यवाही, सर्व कार्यालयीन अधीक्षकांना दिलेल्या आदेशाच्या प्रती यांची माहिती त्यांना दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्या सौ. मृणालिनी श्रीहरी जोशी ह्या कार्यालय अधीक्षक होत्या की नाही, याबाबतची संबंधित कालावधीसह स्पष्टता व त्यांच्या सेवानिवृत्ती लाभासंदर्भातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे श्री. के.टी. सुकासे यांनी त्यांना देऊन पूर्तता अहवाल दि. १०.७.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

पुणे
दि. 16 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ